Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 13 April 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १३ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी याचं नेतृत्व असल्यामुळेच आपल्या पक्षानं महायुतीला पाठिंबा दिला असल्याची माहिती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी मुंबईत वार्ताहारांशी बोलताना आज दिली. तसंच लोकसभा निवडणूकीत महायुतीचा प्रचार करण्यासाठी आमच्या पक्षातील कोणाशी संपर्क साधायचा, याविषयीची माहितीही लवकरच देणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगर इंथ महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या प्रचार कार्यालयाचं उद्घाटन शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांच्या हस्ते आज सकाळी करण्यात आलं. तसंच  केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपूर इंथ भेट घेत महायुतीच्या उमेदवारीबाबत चर्चा केली.

****

मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात आज तुरळक ठिकाणी जोराचे वारे, विजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भात गारपिटीसह पावसाची शक्यता आहे.

गोंदिया जिल्ह्यात सर्वच तालुक्यात सलग पाच दिवसांपासून वादळी पाऊस पडल्यानं सर्वाधिक फटका सडक अर्जुनी तालुक्याला बसला आहे. पिपरी परिसरात शेतातलं उभं मक्याचं पीक जमीनदोस्त झालं. त्याशिवाय फळभाज्यांचही मोठं नुकसान झालं आहे.

****

कोविड काळात भारतनं शंभराहून अधिक देशांना कोविड प्रतिबंधक लस पुरवली; त्यामुळे कोविडनंतर भारताकडे पाहण्याचा जगातील अनेक देशांचा दृष्टीकोन

बदलला आहे. जगभरातील जनता आता भारतासोबत असल्यानं देशाला लवकरच संयुक्त राष्ट्राचं कायमस्वरूपी सदस्यत्व मिळेल, असा विश्वास परराष्ट्र व्यवहार मंत्री एस.जयशंकर यांनी व्यक्त केला आहे. ते काल पुणे इथं आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते.

भारताच्या जागतिक उदयाचा प्रवास या विषयावर जयशंकर यांनी यावेळी संवाद साधला. गेल्या चार वर्षांत भारताच्या संस्कृतीसह वारशाबद्दल नागरिकांमध्ये स्वयंजागृती झाली, असून देशातील बुद्धिमत्तेला अधिक संधी देण्यासाठी पायाभूत सुविधा, स्टार्ट अप, आणि व्यवसायपुरक वातावरण तयार होत आहे असं त्यांनी नमूद केलं.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या आकाशवाणीच्या कार्यक्रमात आज आपण बुलडाणा लोकसभा मतदार संघाचा आढावा ऐकणार आहोत. संध्याकाळी सव्वासात वाजता हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल.

****

वाशिम जिल्ह्यात सध्याच्या निवडणूक आचारसंहीतेच्या काळात अवैध दारु विक्रीसह त्याच्या वाहतुकीवर आळा घालण्यासाठी नियुक्त विशेष पथकांनी मुद्देमाल जप्त करत दोषींवर गुन्हा नोंदवला आहे. जिल्ह्यात मंगरुळपीर तालुक्यात दुचाकीवरुन देशी दारुची अवैध वाहतुक होत असल्याप्रकरणी दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आलं. तर, रिसोड इंथ संशयीत चारचाकीची वाहनाची तपासणी करत देशी-विदेशी मद्द्याच्या बाटल्या,चारचाकी ताब्यात घेवून पथकानं चार जणांवर गुन्हा नोंदवला.

****

राज्यात ठिकठिकाणी मतदान जनजागृती करण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत.

परभणी जिल्ह्याच्या गंगाखेड शहरात मतदान जनजागृती स्विप उपक्रमांतर्गत सायकल रॅलीचं आज आयोजन करण्यात आलं होते. यात गंगाखेड नगरपरिषद मुख्याधिकारी जयवंत सोनवणे, पूर्णा नगरपरिषद मुख्याधिकारी युवराज पौळ यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

नाशिक जिल्ह्यात लोहोणेर जनता विद्यालयाच्या शिक्षकांनी वासुदेवाच्या भूमिकेतून मतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं.

मतदान जनजागृतीकरता अकोल्यातील 'दिव्यांग मदत कक्षा'तर्फे मतदान जनजागृती रॅली घेण्यात आली.
पालघर जिल्ह्यात मतदान जनजागृतीसाठी बोर्डी इथं साडेसातशे विद्यार्थ्यांनी मिळून मानवी साखळी केली होती.

****

लोकसभा निवडणुकीचं मतदान करण्यासाठी, मतदान कार्डाव्यतिरिक्त अन्य बारा प्रकारचे ओळखीचे पुरावे केंद्रीय निवडणूक आयोग ग्राह्य धरणार आहे. त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखवल्यावर मतदान शक्य आहे. मतदार यादीतील नावासोबत एखाद्याच्या सध्याच्या पत्त्यासह बदल नमूद असेल, मात्र त्या बदलासह अद्याप नवं कार्ड मिळालं नसेल तर आधीचं कार्ड ग्राह्य धरलं जाईल.
सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान तारखेच्या किमान पाच दिवस आधी-मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ इत्यादी माहितीच्या चिठ्ठ्यांचं निवडणूक कार्यालयाकडून वितरण केलं जाणार आहे. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना माहितीची चिठ्ठी आणि छायाचित्र असलेलं ओळखपत्र सोबत घेऊन यावं, असं आवाहन निवडणूक आयोगानं केलं आहे.

****

पुणे जिल्ह्याच्या बारामती मतदार संघात बहुजन समाज पार्टी आंबेडकर गटाच्या त्रिशला कांबळे यांनी काल आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून शकील अब्दुल करीम सावंत यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज सादर केला. सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी दिपक ऊर्फ व्यंकटेश्वरा महास्वामी यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार दादगोंडा चौगोंडा पाटील यांनी अर्ज दाखल केला आहे.

****

इंडियन प्रीमिअर लीग -आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्स आणि राज्यस्थान रॉयल्स यांचा सामना होणार आहे.

****